TCS कंपनीच्या संगणक तज्ञांचे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१७ चे वेतन अदा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईगव्ह १५१८/प्र.क्र.७/संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०१८

वाचा :

१) **शासनाचे पत्र क्र.No.MIS१७१६/C.R.३/Computer, दिनांक २५ सप्टेंबर, २०१७**

२) **आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.ईगव्हर्नन्स २०१७-२०१८/प्रस्ताव-२/ आस्था-क/१४३, दिनांक ३१ जानेवारी, २०१८ चे पत्र.**

प्रस्तावना :

ई-गव्हर्नन्स योजनेतंर्गत विभागाच्या अखत्यारित्य येणाऱ्या शासकीय, खाजगी अनुदानित तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळांतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने शालार्थ प्रणालीतून देण्यात येते. शालार्थ प्रणालीचे कामकाज पाहण्यासाठी TCS कंपनीचे संगणक तज्ञं नियुक्त केले आहेत. सदर काम आता महाआयटी कडून पाहिले जाणार आहे. याकरिता शालार्थ प्रणालीचे महाआयटीच्या संगणक तज्ञांकडे Knowledge Transfer करण्यासाठी TCS कंपनीच्या ८ संगणक तज्ञांना ६ महिन्याची मुदत देण्यात आली आहे. TCS कंपनीच्या संगणक तज्ञांचे माहे ऑक्टोबर, २०१७ व माहे नोंव्हेंबर, २०१७ चे वेतन अदा करण्यासाठी रू.२०,४४,०८१/- इतकी रक्कम वितरीत करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून संदर्भ क्रमांक २ अन्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

शालार्थ वेतन प्रणालीचे ६ महिन्याचे कामकाज पाहण्यासाठी TCS कंपनीच्या ८ संगणक तज्ञांना रू.१,८५,०००/- प्रतिमहा या दराने दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. सदर संगणक तज्ञांपैकी प्रत्यक्षात कार्यरत असणाऱ्या ३ संगणक तज्ञांचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या व ७ संगणक तंज्ञांचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या वेतनाचा तपशील परिशिष्ट-अ मध्ये सोबत जोडला आहे

२. टाटा कन्सलटन्सि सर्व्हिसेस लिमिटेड (TCS), मुंबई कंपनीच्या शालार्थ प्रणालीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या संगणक तज्ञांचे माहे ऑक्टोबर, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या दोन महिन्यांचे एकत्रित वेतन (रू.६,५४,९०० + रू.१३,८९,१८१) = रू.२०,४४,०८१/- (रूपये वीस लाख चव्वेचाळीस हजार एक्याऐंशी फक्त) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८०-सर्वसाधारण शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१७-१८ च्या उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१७१६२८५०१७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2018.02.17 16:28:46 +05'30'

(प्रविण मुंढे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर १ / २
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर १ / २
७. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. निवडनस्ती (संगणक)

परिशिष्ट-अ

माहे ऑक्टोबर, २०१७ चा तपशील

Sr.No.	Employee Name	Envoice No.	Units	Rate	Amount (INR)
1	Ms.Sneha Sharma	MHDI 518009744	1 Mos	1,85,000	1,85,000
2	Ms.Neha Gaurava Bhure		1 Mos	1,85,000	1,85,000
3	Ms.Madhuri Kulkarni		1 Mos	1,85,000	1,85,000
			Total = 5,55,000/-		
				CGST =9%	49,950
				SGST =9%	49,950
				Total Amount = 6,54,900/-	

माहे नोव्हेंबर, २०१७ चा तपशील

Sr.No.	Employee Name	Envoice No.	Units	Rate	Amount (INR)
1	Ms.Sneha Sharma	MHDI 518009944	1 Mos	1,85,000	1,85,000
2	Ms.Neha Gaurava Bhure		.95455 Mos	1,85,000	1,76,591.75
3	Ms.Madhuri Kulkarni		.77273 Mos	1,85,000	1,42,955.05
4	Mr.Yash Sikkewal		.90909 Mos	1,85,000	1,68,181.65
5	Mr.Atal Suhas Phatak		.90909 Mos	1,85,000	1,68,181.65
6	Ms.Pooja Gaunjhu		1 Mos	1,85,000	1,85,000
7	Ms.Darshna Mahale		.81818 Mos	1,85,000	1,51,363.30
			Total = 11,77,273/-		
				CGST =9%	1,05,954
				SGST =9%	1,05,954
				Total Amount = 13,89,181/-	

माहे ऑक्टोबर, २०१७ व नोव्हेंबर, २०१७ एकूण वेतन २०,४४,०८१/-

माहे ऑक्टोबर, २०१७ व नोव्हेंबर, २०१७ चा एकत्रित वेतन रू.२०,४४,०८१/- (रूपये वीस लाख, चव्वेचाळीस हजार, एक्याऐंशी फक्त)